क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. २१३ दिनांक २१ / ०२ / २००९

विषय : कार्यालयातील उपस्थिती तपासण्यासाठी अचानक भेटी देण्याबाबत.

संदर्भ : शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक १८.११.२००८.

......

कंपनीतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत उपस्थित राहण्याबाबतच्या सूचना प्रशासकीय परिपत्रक क्र.१६७ दिनांक १२.०८.२००८ अन्वये यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. याच संदर्भात कक्ष अधिकारी, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे क्र.एमआयएस-८०९/स.क.१२/प्रशा-४ दिनांक २२.०१.२००९ च्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

२. सर्व अधिकारी/कर्मचारी यांना विनंती करण्यात येते की त्यांनी संदर्भिय दिनांक १८.११.२००८ च्या शासन परिपत्रकान्वये अवलोकन करावे व कार्यालयीन उपस्थितीबाबतच्या यापूर्वी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

३. सदर प्रशासकीय परिपत्रक www.mahadiscom.in या कंपनीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*D:\O&M\Adm.Circular F.N.348*
*13/2/2009*

**शासकीय अधिकारी /कर्मचाऱ्यांची कार्यालयातील उपस्थिती तपासणीसाठी अचानक भेटी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १८ नोव्हेंबर, २००८

संदर्भ:- शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, २००८

**शासन परिपत्रक :-**

शासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहावे. या संदर्भात यापूर्वी काही परिपत्रके शासन स्तरावर निर्गमित करण्यात आली आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांची कार्यालयातील वेळेवरील उपस्थिती तपासण्यासाठी खात्रीलायक संगणकीय पध्दती निर्माण करण्याचा निर्णयही शासनाने घेतला असून संगणकीय प्रणाली प्रस्थापित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. असे असले तरी त्यासंबंधी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्हयातील शासकीय कार्यालयातील उपस्थिती तपासण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अशा भेटींच्यावेळी श्री.अण्णा हजारे यांच्या संस्थेचा अथवा जिल्हयातील इतर सेवाभावी संस्थाच्या प्रतिनिधींना देखील उपस्थित राहण्याची अनुमती द्यावी असे मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मान्य झाले होते. त्यास अनुलक्षून शासकीय कार्यालयातील उपस्थितीची तपासणी करतेवेळी जिल्हाधिकारी यांच्या समवेत जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी व श्री.अण्णा हजारे यांच्या संस्थेचा किंवा जिल्हयामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या इतर सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधीचांही समावेश करण्यात यावा असा बदल करण्यात येत आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या या सूचनांची नोंद घेवून योग्य कार्यवाही वेळोवेळी करावी असे सूचित करण्यात येत आहे.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८१११८११३८५६००१ असा आहे.

आदेशानुसार,

**(प्र.ल.पाठक )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

राज्यपालाचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधनसभा सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख
सामान्य प्रशासन विभागातील सर्व प्रशासकीय कार्यालये
सामान्य प्रशासन विभागातील कार्यासने,
निवडनस्ती * पत्राने